# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 19/ 05/2022**


## अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १८/०५/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६० वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन २९,३००/– रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

## वाहतुकीस अडथळा करणा–या वाहनावर कार्यवाही :–

हिंगोली जिल्हयामध्ये वाहतुकीस अडथळा करणा–या वाहनावर करणाऱ्याविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक १८/०५/२०२२ रोजी नर्सी ना. येथे ०३ ठिकाणी कार्यवाही करून आरोपीतांविरूध्द २८३ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक १८/०५/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन हिंगोली ग्रा., औंढा ना.,येथे प्रत्येकी ०२ तसेच पोस्टे हिंगोली शहर, बासंबा, हट्टा, वसमत ग्रा. येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०८ ठिकणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ४५.११ लिटर दारू असा एकुण १२,४९०/–रू कि.अं ची अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि. १८/०५/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे हिंगोली शहर व पोस्टे कळमनुरी येथे प्रत्येकी ०१ अशा एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व एक मोबाईल व नगदी रू. असा एकुण २,२२०/–रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

## जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :–

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.